अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड




www.surajyadigital.com । रविवार, दि. १ मार्च २०२६ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : १५२ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२




# अमेरिकेने इराण पेटवला, इराणने गल्फ जाळला!

## इस्रायल -इराण वादात जगाची फरफट

### ७ इराणी नेत्यांचा खात्मा करण्याचा ट्रम्प यांचा इरादा

### मिसाईल हल्ल्यात इराणमधील ५० शाळकरी मुलींचा मृत्यू




सविस्तर पान १२ वर

**नवी दिल्ली :** सारे जग नेहमीप्रमाणे धावत असताना शनिवारी मोठा हादरा बसला. त्या जबर धक्क्याने उभे विश्व चक्रावून गेले आहे. अमेरिका- इस्त्रायल यांच्या एकीतून आखाती देशांमध्ये प्रबळ असलेल्या इराणवर आण्विक हल्ले सुरू केले. त्याला प्रतिउत्तर म्हणून इराणने अमेरिकेसह इस्त्रायल आणि त्यांना रसद पुरवणाऱ्या देशांवर हल्ले सुरू केले. त्यामुळे आखाती देशांमध्ये युद्धाचा भडका उडाला आहे. दरम्यान अमेरिकेने हल्ले करून इराण पेटवला तर इराणने प्रतिहल्ला करून गल्फ जाळण्याचा प्रयत्न केला आहे. इराण-इस्त्रायल यांच्या संघर्षात जगाची फरफट होईल असे दिसते.

गेल्या काही महिन्यांपासून अमेरिका आणि इराण यांच्यात धुसफूस सुरू होती. अखेर त्याचा विस्फोट झाला. अमेरिका आणि इस्त्रायल यांच्याकडून इराणच्या सत्तेतील ७ नेत्यांचा खात्मा करण्याचा इरादा आहे. दरम्यान दोन्ही देशांकडून झालेल्या भीषण हल्ल्यात इराणमधील ४० ते ५० शाळकरी मुलींचा मृत्यू झाला आहे.

### अमेरिकेला सत्तापालट का हवा आहे?

१९७९च्या इस्लामिक क्रांतीपासून इराण अमेरिकेच्या नियंत्रणाबाहेर आहे. इराण हा मध्य पूर्वेतील एक महत्वाचा देश आहे, जो अमेरिकेच्या धोरणांचा कट्टर विरोधक आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीवर इराणचे नियंत्रण आहे, जिथून २० टक्के जागतिक व्यापार जातो. शिवाय, इराणकडे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे तेल साठे आहेत. मध्य पूर्वेत इराणच्या अनेक प्रॉक्सी संघटना आहेत, ज्या अमेरिका आणि त्याच्या मित्र राष्ट्रांना सतत त्रास देत आहेत.

आता तर इराणवह हल्ले करून जणू नरसंहार घडवत आहेत. इराणमध्ये संभाव्य सत्तापालट करण्याच्या हेतुने सात नेते आणि लष्करी अधिकारी इस्रायली अमेरिकेच्या हिटलिस्टवर असल्याची माहिती मिळाली आहे. कोणत्याही किंमतीत हल्ले आणि गोपनीय ऑपरेशनद्वारे या सात व्यक्तींना संपवण्याचा अमेरिकेचा मानस आहे. हे साध्य करण्यासाठी लक्ष्यित हल्ला करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### ते सात लोक कोण?

अमेरिकन आउटलेट ॲक्सिओसने इस्रायली आणि अमेरिकन अधिकाऱ्यांचा हवाला देत वृत्त दिले आहे की, ज्या उद्देशासाठी युद्ध सुरू करण्यात आले होते. त्यासाठी सात व्यक्तींना मारणे आवश्यक आहे. अमेरिका आणि इस्रायल सर्व सात नेत्यांना मारून इराणची स्थिती कमकुवत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई हे यादीत सर्वात वर आहेत. इस्रायलने त्यांच्या तेहरानमधील घरावरही हल्ला केला होता. खामेनेई त्यावेळी तेहरानमध्ये नव्हते, त्यामुळे त्यांना काहीही झाले नाही. त्यांच्याव्यतिरिक्त, राष्ट्राध्यक्ष मसूद पजेश्कियान हेदेखील अमेरिकेच्या हिटलिस्टवर आहेत. म्हणूनच पजेश्कियान यांच्या घरावरही हल्ला करण्यात आला होता.

याशिवाय, इराणच्या परिषदेचे सर्वोच्च सचिव अली लारीजानी, इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सचे कमांडर अहमद वाहिदी, खामेनेई यांचे सर्वोच्च सुरक्षा सल्लागार अली शामखानी, माजी राष्ट्राध्यक्ष महमूद अहमदीनेजाद आणि परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांचाही खात्मा करू करण्यासाठी अमेरिका इच्छुक आहे. कारण हे सर्व नेते इराणचे सर्वोच्च धोरणकर्ते आहेत.

### भविष्यातील नेते लक्ष्यावर

अहवालांनुसार, अमेरिका इराणच्या भावी नेत्यांनाही लक्ष्य करत आहे. अलिकडेच, इराणच्या सर्वोच्च नेत्याने प्रत्येक विद्यमान नेत्यासाठी चार उत्तराधिकारी नियुक्त केले आहेत, जेणेकरून युद्ध झाल्यास इराण नेतृत्वहीन राहणार नाही. म्हणूनच, इराणमध्ये सत्तापालट झाल्यास अमेरिका आणि इस्रायलला किमान १ हजार वरिष्ठ नेते आणि अधिकाऱ्यांना संपवावे लागेल. द टेलिग्राफच्या मते, यासाठी अमेरिकेला इराणमध्ये किमान १० लाख सैन्य तैनात करावे लागेल. त्यानंतरच करार होईल. ॲक्सिओसने इस्रायली अधिकाऱ्यांचा उल्लेख करून म्हटले आहे की, जर युद्धादरम्यान इराणी जनता रस्त्यावर उतरून सत्तापालट करत नसेल, तर आम्ही आमच्या भविष्यातील रणनीतीचा विचार करू.

## एकाचवेळी चार देशांवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे डागली



इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या कार्यालयाजवळ अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या संयुक्त हल्ल्याचा बदला म्हणून इराणच्या सैन्यांनी एकाच वेळी इस्रायल, बहरीन, युएई आणि कतारवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. युएईची राजधानी अबू धाबी येथे स्फोटांचे आवाज ऐकू आले, तर कतारच्या क्षेपणास्त्र संरक्षण यंत्रणेने एक क्षेपणास्त्र हवेतच रोखले.अबू धाबीमध्ये युएई हवाई दल आणि अमेरिकन हवाई दलाचा अल धफ्रा हवाई तळ आहे. दोहामधील २४ हेक्टर परिसरात पसरलेला अल उदेद हवाई तळ हा अमेरिकेच्या सेंट्रल कमांडचे मुख्यालय मानला जातो. बहरीनने बेटावरील अमेरिकन नौदलाच्या पाचव्या फ्लीटच्या मुख्यालयावर क्षेपणास्त्रहल्ला झाल्याची माहिती दिली. अमेरिकन नौदलाच्या पाचव्या फ्लीटच्या कार्यक्षेत्रात आखात, लाल समुद्र, अरबी समुद्र आणि हिंदी महासागरातील काही भागांचा समावेश होतो. अनेक अमेरिकन जहाजांचे गृहबंदर बहरीनमध्ये असून, त्यात खाणविरोधी जहाजे आणि लॉजिस्टिक सपोर्ट जहाजांचाही समावेश आहे.

**''त्यांच्या नौदलाचाही नाश करू''**

''काही काळापूर्वी अमेरिकन सैन्याने इराणमध्ये मोठी लष्करी मोहीम सुरू केली आहे. इराणी राजवटीकडून येणारा धोका दूर करून अमेरिकन लोकांचे रक्षण करणे हे आमचे उद्दिष्ट आहे,'' असे ट्रम्प म्हणाले. ''इराणकडे अण्वस्त्रे नसावीत, कधीच नाही. या राजवटीने अमेरिकन लष्करी सामर्थ्याला आव्हान देऊ नये, हे त्यांना समजेल. आम्ही त्यांची क्षेपणास्त्रे आणि क्षेपणास्त्र उद्योग उद्ध्वस्त करू, तसेच त्यांच्या नौदलाचाही नाश करू,'' असेही त्यांनी नमूद केले.

**सौदीमध्ये दोन हजार अमेरिकन सैनिक**

दरम्यान, सौदी अरेबियामध्ये अमेरिकेचे २,००० हून अधिक सैनिक तैनात असल्याची माहिती आहे. त्यापैकी काही सैनिक रियाधपासून सुमारे ६० किमी दक्षिणेला असलेल्या प्रिन्स सुलतान एअर बेसवर कार्यरत आहेत. या तळावर अमेरिकन लष्कराच्या मालमत्तेला आधार देण्यात येतो, ज्यात पॅट्रियट क्षेपणास्त्र बॅटरी आणि टर्मिनल हाय अल्टिट्यूड एरिया डिफेन्स प्रणालीचा समावेश आहे.

ICC MEN'S T20 WORLD CUP

**आजचा सामना**

इंग्लंड v/s न्यूझीलंड

स्थळ : कोलंबो
वेळ : सायंकाळी ७ वाजता

**तिसरा डोळा**

– प्रकाश पोरे




आता महागाई सुसाट...

कल्याण
148-33-689

### ‘इंस्टाग्राम’वरुन दोन महिन्यांपूर्वी ओळख

## विजयपूरच्या अभिषेकने सोलापुरात येऊन श्रीदेवींच्या घेतल्या भेटी

**पाटील दाम्पत्याच्या आत्महत्या प्रकरणाचा नवा व्टिस्ट समोर**

**संशयित कोरे हा लफडेबाज, सांगोल्यात मुलीला ब्लॅकमेलिंग**

**व्हिडीओ अन् फोटो व्हायरल करण्याची धमकी देऊन केला होता छळवाद**

**सोलापूर :** सोलापूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कलावती नगर येथे पती-पत्नीनं आयुष्य संपवल्याच्या शुक्रवारच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर, पोलीस तपासामधून नवा मोठा व्टिस्ट समोर आला आहे. संशयित आरोपी अभिषेक कोरे आणि मृत श्रीदेवी पाटील यांची दोन महिन्यांपूर्वी ‘इंस्टाग्राम’ वर ओळख झाली होती. या टप्प्यावर तो विजयपूरवरुन श्रीदेवींना भेटण्यासाठी सोलापुरात आला होता.दोघांमध्ये तीन-चार वेळा भेट झाली होती, अशी



माहिती या प्रकरणाच्या अनुषंगाने, तपासाच्या टप्प्यावर समोर आली आहे. समोर येत असलेल्या माहितीनुसार, आत्महत्येच्या या घटनेला अनैतिक संबंधाची झालर लागू शकते, असा अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात आला असून ४ मार्च २०२६ पर्यंतच्या पोलीस कोठडीदरम्यान याप्रकरणाचे अनेक कंगोरे समोर येतील, असं एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रमोद वाघमारे यांनी शनिवार (ता.२८) दैनिक ‘सुराज्य’ला सांगितलं.

अभिषेक कोरे या इंस्टाग्रामवरील मित्राच्या त्रासाला कंटाळून सोमनाथ धानप्पा पाटील (वय ४०) आणि श्रीदेवी सोमनाथ पाटील (वय ३५) या पती-पत्नीने विष प्राशन केले. शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी सकाळी सहा वाजता ही घटना उघडकीस आली होती. सोलापूर अक्कलकोट रोड एमआयडीसीतील कलावती नगरात ही घटना घडली.

पान ७ वर...

### साधं मतदान ओळखत्र नाही; तो अभिषेक राजकारणी कसला?

पाटील पती-पत्नीच्या आत्महत्येप्रकरणी अटकेत असलेल्या संशयित अभिषेक हा राजकारणी असल्याची माहिती सुरुवातीला समोर आली होती. मात्र त्याचा राजकारणाशी काडीचा संबंध नाही. त्याच्याकडं मतदान ओळखपत्रंदेखील नाही, असं पोलीस निरीक्षक वाघमारेंनी स्पष्ट केलं.

### लफडेबाज अभिषेककडून पोलिसांना ‘या’ प्रश्नांची हवी आहेत उत्तरे...

इंस्टाग्रामवर ओळख कशी झाली होती? विजयपूरहुन अभिषेक हा सोलापुरात मृत श्रीदेवींना नेमका भेटला कोठे? तीन-चार वेळा त्यांनं सोलापुरात त्यांची नेमकी कोठे भेट घेतली? भेटीचे ठिकाण बदलले होते का? श्रीदेवींना भेटण्यासाठी तो का आला होता? विजयपूरच्या अभिषेक यास भेटण्याचे श्रीदेवींचं कारण तरी काय? या दोघांमध्ये प्रेमसंबंध जुळले होते का? प्रेमसंबंधांचं अनैतिक संबंधांमध्ये रुपांतर झालं होतं का? या प्रश्नांची उत्तर पोलिसांना अभिषेककडून हवी आहेत, त्यादृष्टीनेच त्यांचा तपास सुरु आहे. अभिषेक आणि मृत श्रीदेवी यांच्याबाबतीमधील प्रश्नांची उकल झाल्यास पाटील नवरा-बायकोच्या आत्महत्येच्या घटनेच्या मुळाशी पोचतील असं पोलिस सुत्रांनी सांगितलं.